'दुर्मिळ' ते तून 'मुबलक' ते कडे.

कृष्णा देहारिया गावाचा कायापालट

संचिथाकुमारन व सुनील श्रीवास्तव

अगदी सक्षमपणे केलेल्या जलसंधारणामुळे कृष्णा देहारिया गावातल्या लोकांनी आपल्या पाण्याची सध्याची गरज तर भागवलीच पण भविष्यातील पाण्याच्या गरजेची सोय करून ठेवली. स्थानिक पातळीवर भक्कमपणे कार्यरत असलेल्या लोकसंस्थांची मोठी मदत या गावाचा कायापालट करण्यासाठी झाली. पाण्यासाठी चिंताग्रस्त असलेले गाव चिंतामुक्त होऊन त्यांच्या उपजीविकांमध्ये व एकंदर जीवनामध्ये सुधार निर्माण झाला.

एका गरीब तहानलेल्या माणसाची तहान शमविण्याइतके सुद्धा पाणी मिळाले नाही तेव्हापासून 'कृष्णा देहारिया' गावाचे नाव 'कसाई देहारिया' पडले. खरं तर कृष्णा देहरिया गावात भरपूर जलस्रोत होते. १९४२ मध्ये मोठा दुष्काळ पडला आणि तेव्हापासून या गावात पाण्याची चणचण वाढली. पुढे २०१० पर्यंत अवस्था बिघडतच राहिली. बहुतेक सर्व शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहिली, माती वाहून गेली, जमिनी ओसाड होऊ लागल्या, चढउताराची जमीन इत्यादी कारणांनी पिण्याच्या व शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची दुर्मिळता वाढतच गेली. महिलांना १-२ किलोमीटर पिण्याचे पाणी आणावे लागत होते.

या गावात १२७ कुटुंबे राहतात व एकूण क्षेत्रफळ ५३२ हेक्टर आहे. यापैकी केवळ २५ हेक्टर जमीन चार छोट्या तलावावर सिंचित आहे. बाकी सर्व शेती पावसावर अवलंबून आहे. यामुळे शेतकरी रबीची पिके घेऊ शकत नव्हते. या कालावधीत गावकरी कामधंद्यासाठी बाजूचे जिल्हे व इतर राज्यामध्ये स्थलांतर करत होते.

पुढाकार

सन २०११-१२ मध्ये 'रिलायन्स फाउंडेशन'च्या रुरल ट्रान्सफॉरमेशन प्रोग्रॅम' अंतर्गत स्थानिक लोकांच्या सहयोगाने कामाची सुरुवात झाली. एकात्मिक, स्वावलंबी व ग्रामीण विकासाचे शाश्वत मॉडेल निर्माण करण्याच्या हेतूने ही सुरुवात



सदृढ स्थोनक लोकसंख्या– शाश्वतत्तेची गुरू किल्ली.

झाली. या पुढाकारामध्ये प्रथम स्थानिक पातळीवर लोकांच्या संस्थांची उभारणी, बांधणी यावर भर दिला गेला. कारण लोक एकत्र येऊन काही करतील तर त्याला एक भक्कम आधार तयार होतो. त्यामुळे लोक कोणतेही विकासाचे काम हाती घेऊन टिकाऊपणाने पुढे घेऊन जाऊ शकतात. एकीची ताकत वाढते. शेतीसाठी पाण्याची गरज अति महत्त्वाची. पाण्याची सुरक्षितता निर्माण करण्यासाठी गावातील शेतकरी समोर आले आणि शेतकरी मंडळ स्थापन केले. लोकांच्या गरजा, आकांक्षांचा अंदाज घेत शेतकरी मंडळाने रिलायन्स फाउंडेशनच्या मदतीने जलसंधारण व मृदसंधारणाची कामे हाती घेतली. परिस्थितीचे अवलोकन करून वैयक्तिक कुटुंब पातळीवर, शेतावर व एकंदर गाव पातळीवर मृद व जलसंधारणाचे सर्वसमावेशक नियोजन तयार केले.

सामूहिक पाणी वापर

गावकऱ्याच्या ध्यानात आले की, जास्तीत जास्त जमीन पाण्याखाली आणण्याच्या हेतूने व पाण्याची सुरक्षितता कायम राखण्याच्या दृष्टीने गावातील जुना कसाई डेहारिया तलावाचा गाळ काढणे आवश्यक आहे. तो काढलेला तलावाचा गाळ म्हणजे उत्तम प्रतिची माती असल्याने पडीक जमिनीवर पसरला. त्यामुळे गावातील ७७ शेतकऱ्याची सुमारे ५७ हेक्टर जमीन पिकाखाली आणणे शक्य झाले.

शेतामध्ये जलसंधारणाची कामे उभारल्यानंतर शेतकरी मंडळाने गावात पाणी वाटप गट स्थापन केला. अनौपचारिकरीत्या या गटाची घटना, कृती, कामे, अधिकार, नियमावली बनवून एकंदर पाण्याच्या उत्तम व्यवस्थापनासाठी या पाणी वाटप गटाचे नियंत्रण

निर्माण केले. यामुळे पाणी वापर, वाटप इत्यादीमध्ये वेगळीच परिणामकारकता निर्माण झाली. सुमारे १ लाख मे. टन इतका गाळ कसाई देहारिया या तलावातून काढण्यात आला. ज्याच्यामुळे पाणीसाठा वाढला व अत्यावश्यक वेळेला पिकांना पाणी देणे सुलभ झाले. या वाढीव पाणी साठ्यामुळे शेतकऱ्यांना खरिपासोबत रब्बी हंगामातील पिके घेणे सोयीचे झाले. त्यामुळे अगोदर २७ हेक्टर जमिनीला पाणी मिळत होते ते आता वाढून २४२ हेक्टर जमिनीला सिंचित करणे शक्य झाले.

शेतातील जलसंधारण

जलसंधारणाचे विविध उपक्रम २४२ हेक्टर शेतावर राबविले गेले. जसे - बांधबंदिस्ती, द्वारे माती व जलसंधारण साधण्याचे प्रयत्न केले. सुमारे ३७ शेततळी बांधण्यात आली. ज्यामुळे संरक्षित सिंचन शक्य झाले. धुऱ्यावर/बांधावर वृक्ष लागवड केली गेली ज्याच्यामुळे जैवविविधता व परागीकरणास फायदा झाला. यामुळे जमिनीचा पोत सुधारला, जैविक काडीकचरा मातीमध्ये मुरला आणि जमिनीची उत्पादकता वाढली. काही शेतकऱ्यांना निव्वळ नफा ५४०० रुपये प्रति हेक्टरवरून ३९,००० रुपये प्रति हेक्टर एवढा वाढला.

गावात बाहेरून आलेल्या वाटसरूला पाण्याचा तुटवडा असल्याने पिण्याचे पाणी नाकारले. त्यामुळे कृष्णा दहेरियाचे नाव 'कसाई दहेरिया' पडले होते.

घरगुती वापराच्या पाण्याचे संधारण

उन्हाळ्यामध्ये लहान मुले व महिलांना पाणी आणण्यासाठी खूप लांबवर चालत जावे लागायचे. दूधपुरा गावातील १.७ कि.मी. दूर असलेल्या कुमार पिपलिया तलावातील पाण्याच्या उपलब्धतेचे विश्लेषण करता कसाई देहरिया या ग्रामस्थानी त्यांच्या गावातील सामूहिक विहिरी त्या तलावाशी पाईपलाईनद्वारे जोडण्याचा संकल्प केला. ग्राम शेतकरी मंडळाने पाईपचा खर्च उचलला तर सर्व श्रमदान ग्रामस्थानी केले. अशा प्रकारे पिण्याचे व घरगुती वापराच्या पाण्याची सोय करून घेतली. त्यामुळे मुले व महिला यांचे लांबून पाणी आणण्याचे कष्ट वाचले.

गावातील सामूहिक विहिरीतील उपलब्ध पाण्याचा उपयोग करून महिलांनी रिलायन्स न्युट्रीशन गार्डन (परसबागेतील भाजीपाला) तयार केला. यामुळे प्रत्येक कुटुंबामध्ये ताजा व सकस असा भाजीपाला उपलब्ध झाला. काही कालावधीनंतर ग्रामस्थानी आपले गाव सरकी नळ जलयोजनेखाली जोडले. प्रत्येक घरामध्ये पिण्याच्या पाण्याचा नळ मिळाला.



शेत तळे– कठिण परिस्थितीने सिंचनाचे साधन.

बदलाचे मॉडेल

गाव पातळीवर ग्राम शेतकरी मंडळाच्या रूपात भक्कम लोक संघटना उभी झाल्यामुळे पाण्याच्या स्रोताचे बळकटीकरण करता आले. अति सक्षम पाणी वापर व पाणी संधारणाच्या पद्धती वापरल्याने गावकऱ्यांनी त्यांच्या सद्दाच्या पाण्याच्या गरजा भागवल्याच पण भविष्यातील पाण्याची चिंता देखील दूर केली ती ही पर्यावरण सुसंगत राहून.

पिकाची व उत्पन्नाची वाढ यासोबतच सामाजिक बाजूने बरेच बदल गावामध्ये घडून आले. पूर्वी ज्या मुली कुटुंबासाठी पाणी दूरवरून आणण्याच्या कामात गुंतलेल्या असायच्या त्या आता शाळेत येऊ लागल्या. एवढेच नव्हे तर ग्रामस्थानी आपल्या गावाचे नाव कसाई दहेरिया सोडून कृष्णा दहेरिया असे नावच बदलले. त्यांनी रेव्हेन्यू रेकॉर्डमध्ये पण गावाचे नाव बदलावे म्हणून जिल्हा अधिकाऱ्यांकडे निवेदन दिले आहे. ही प्रक्रिया सुरू आहे.

Ranchitha Kumaran and Sunil Shrivastava
Reliance Foundation
RCP Project Office, 1st floor
Gansoli, Navi Mumbai-400 701
Email: ranchitha.kumaran@reliancefoundation.org
sunil.shrivastava@reliancefoundation.org

Source : *From scarcity to abundance - Transformation of Krishna Dehariya village, LEISA India September, 2015*

मराठी अनुवाद : श्री. दत्ता पाटील